# जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

## (जमाबंदी-१ शाखा)

फोन क्र.०२४४२/२२२६०४ फॅक्स क्र.०२४४२/२२२०

---

पहा:-१. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन-१०/२००५/प्रक्र.३८/ज-१/दिनांक ७/३/२००६.
२. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग परिपक्रएलएनडी-१०९०/२२०२३१/प्र.क्र.२०० ज-१दिनांक ५/४/१९९१.
३. कार्यकारी अभियंता(स्थापत्य) स्थापत्य विभाग म.रा.वि.वि.कंपनी मर्या. लातुर याचे पत्र क. दिनांक ०४/०३/२०१४
४. उप विभागीय अधिकारी, परळी यांचे पत्र क्र २०१४/जमा/२/कावि दिनांक २६/१२/२०१४
५. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन ०५/२०११/प्रक्र.९०/ज-१दि. २७/७/२०११.
६. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन ०५/२०११/प्रक्र.९०/ज-१दि. १७/१०/२०११.
७. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन ०३/२०११/प्रक्र५३/ज-१दि.१२/७/२०११.

क्रमांक २०११/मशाका/जमा-१/कावी /१४
जिल्हाधिकारी कार्यालय बीड
दिनांक :- /०३/२०१५

आदेश

ज्या अर्थी कार्यकारी अभियंता(स्थापत्य) स्थापत्य विभाग म.रा.वि.वि.कंपनी मर्या. लातुर यांनी संदर्भीय क्र.३ अन्वये **मौजे. संगम ता. परळी जि.बीड** येथे ३३ के.व्ही उपकेंद्रासाठी **मौजे. संगम ता. परळी जि.बीड** येथील शासकीय गायरान जमीन स.न. १६७ मधून ०.८० आर जमीनीची मागणी केली आहे. त्यानुसार उप विभागीय अधिकारी, ~~अंबेजो~~ परळी यांचे पत्र क्र २०१४/जमा/२/कावि दिनांक २६/१२/२०१४ अन्वये प्रस्ताव सादर करुन जमीन मंजूर करणेस शिफारस केली आहे.

त्या अर्थी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम २०,३१नुसार व महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमीनींची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ चे नियम ५ ला संदर्भ क्र.५,६,७,८ ला आधिन राहून व उक्त शासन निर्णयातील अटी व शर्तीतस अधीन राहून अन्वये **मौजे. संगम ता. परळी जि.बीड** ३३ के.व्ही उपकेंद्र अन्वये **मौजे. संगम ता. परळी जि.बीड** येथील शासकीय गायरान जमीन स.न. १६७ मधून ०.८० आर जमीन कार्यकारी अभियंता(स्थापत्य) स्थापत्य विभाग म.रा.वि.वि.कंपनी मर्या. लातुर यांना आदेशातील अटी व शर्तीस आधीन राहून खालील चतु:सिमा प्रमाणे आगावू ताबा देण्याचे आदेशीत करण्यात येत आहे.

**चतू:सिमा**

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | :- | लागुन ग.नं. १६७ उर्वरित जमीन |
| पश्चिमेस | :- | लागुन ग.नं. १६७ उर्वरित जमीन |
| दक्षिणेस | :- | लागुन ग.नं. १६७ उर्वरित जमीन |
| उत्तरेस | :- | रस्ता |

अटी/ शर्ती

१. जमीनीचा आगावू ताबा दिल्याच्या दिनांकापासून जमीनीचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी म.रा.वि.वि.कंपनीची असेल व जमीनीचा वापर विहीत प्रयोजनासाठी करावयाचा नसेल तर सदरील जमीन शासनाकडे कोणतीही नुकसान भरपाई न मागता परत करण्याची जबाबदारी म.रा. वि कंपनीवर राहील.

२. शासन परिपत्रक क्र. एलएनडी-१०९०/२२०२३१/प्र.क्र.२०० ज-१ दिनांक ५/४/१९९१.अन्वये भागाधिकारी म ठरविणे/शर्ती व अटी निश्चीत करणे इतर बाबी आगावू ताबा दिल्यानंतर पूर्ण करावयाच्या असल्यामूळे शासन भागाधिकार मूल्य निश्चित करेल ते व्याजासह भरण्याचे व जमीन प्रदानाबाबत ज्या अटी व शर्ती असतील त्या तंत पाळव्या लागतील.

३. सन २०१५ चे भोगाधिकार मूल्याची जी रक्कम देय ठरेल ती रक्कम जमीनीचा आगावू ताबा दिले दिनांकापासून शासनाचे स्थाई आदेशाप्रमाणे ठरवून दिलेल्या दराने होणा-या व्याजासह शासनाकडे विनावि भरावी.

४. शासकीय जमीनीचे भोगाधिकार मूल्य ठरवणे, शर्ती व अटी निश्चित करणे इत्यादी बाबी आगाऊ ताबा दिल्या पूर्ण करावयाच्या असल्यामुळे शासन जे भागाधिकार मूल्य निश्चित करील ते व्याजासह भरण्याचे व मान्य अ बददल महाराष्ट्र राज्य विद्यूत कंपनीस स्टॅम्प पेपरवर लेखी कबुलायत देणे आवश्यक आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, बीड
(जमाबंदी-१ शाखा)
फोन क्र.०२४४२/२२२६०४ फॅक्स क्र.०२४४२/२२२०११

580

५. महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे ) नियम १९७१ मधील तरतुदीनुसार जमीन देण्यात येत असून सदरील प्रस्तावात काही कागदपत्र अपूर्ण असल्यास सर्व कागदपत्राची पूर्तता करुन देण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांची राहील.

६. उपरोक्त जमीनीची कंपनीस आवश्यकता नसेल तेव्हा ती जमीन महसूल खात्यास परत करावी लागेल व त्या जमीनीची विल्हेवाट महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व त्या खालील नियमानुसार करण्यात येईल.

७. मंजूर केलेल्या जमीनी पैकी १० टक्के क्षेत्रावर वृक्ष लागवड करुन त्याची जोपासना करणे कंपनीस बंधनकारक राहील व या अटीचे उल्लंघण केल्यास शर्तभंग समजून कार्यवाही केली जाईल.

८. सदर जमीन दिलेल्या प्रयोजनार्थ एक वर्षाच्या आंत उपयोगात आणावी .अन्यथा जमीन परत घेण्यात येईल .

९. कंपनी सदर जमीन भोगवटदार वर्ग-२ म्हणून धारण करेल मंजूर आदेशातील अटीचा भंग झाल्यास सदर जमीन परत बांधकामासह त्यावरील सर्व बाबीसह सरकार जमा करण्यास पात्र राहील व कंपनीस कोणताही मोबदला मागण्याचा हक्क राहणार नाही.

१०. ज्या कामासाठी जमीनीचे विनियोजन करण्यांत आले आहे त्याचा वापर त्याच कारणासाठी केला पाहिजे. त्या जमीनीचे हस्तांतरण ,विक्री,लीजवर खाजगी व्यक्तीस अथवा अन्य खात्यास जिल्हाधिकारी बीड याचे पूर्व परवानगी शिवाय करता येणार नाही.

स्वांक्षरीत/-
जिल्हाधिकारी बीड करिता

प्रतिलिपी,

१. मा. अपर मुख्य सचिव महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहीतीस्त सविनय सादर.
३ कार्यकारी अभियंता(स्थापत्य) स्थापत्य विभाग म.रा.वि.वि.कंपनी मर्या. लातुर .
४. उप विभागीय अधिकारी, परळी
५. अधिक्षक भूमी अभिलेख बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
६. तहसिलदार परळी यांना देवून कळविण्यात येते की उप अधिक्षक भूमी अभिलेख परळी याचे कडील सदर जमीनीच्या मोजणी प्रमाणे जमीनीचा ताबा कार्यकारी अभियंता(स्थापत्य) स्थापत्य विभाग म.रा.वि.वि.कंपनी मर्या. लातुर यांना देवून कब्जे पावती व पंचनाम्यासह अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.
७. उप अधिक्षक भूमी अभिलेख, परळी

जिल्हाधिकारी बीड करिता